<u>प्रेसनोट दिनांक १३/०४/२०२३</u>

# मुंबई पुणे हायवेवर ट्रकमधुन लोंखडी सळई चोरणारी टोळी जेरबंद
# १९ लाख रुपयेचा मुद्देमाल जप्त
# खंडणी विरोधी पथक,गुन्हे शाखा यांची कामगिरी

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील मालमत्तेच्या गुन्हयास प्रतिबंध व्हावा व गुन्हे उघडकीस आणावेत याबाबत दिलेल्या आदेशाप्रमाणे, खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे, खंडणी विरोधी पथकाकडील अधिकारी व अंमलदार हे खाजगी वाहनाने तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत लिंबफाटा, तळेगाव दाभाडे, पुणे येथे आले असता, खंडणी विरोधी पथकाचे वपोनि अरविंद पवार यांना मिळालेल्या बातमी वरुन, तळेगाव दाभाडे गावचे हद्दीत जुना मुंबई-पुणे हायवे लगत असणाऱ्या हॉटेल रांगडा दरबारचे मागील मोकळया जागेत, ता.मावळ, जि.पुणे येथे खंडणी विरोधी पथकाकडील अधिकारी व अंमलदार यांनी सापळा लावुन, इसम नामे १) निजाम नवाब खान वय-५८ वर्षे रा. सध्या पप्पु खळदे यांची खोली, हॉटेल रांगडा दरबारचे मागे, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे मुळगाव-रहिमानिया मस्जिदजवळ, कमलारमननगर, बैंगणवाडी, गंवडी, मुंबई २)शत्रुघन महाबल ठाकुर वय-६० वर्षे रा. सुजा वेंचर सोसासटी, सोमाटणे फाटा, तळेगाव दाभाडे, पुणे मुळगाव-पुराबजार, तहसिल-सदर, जि.आयोध्या, उत्तरप्रदेश ३)इसराल अहमद आबेदअली शेख, वय-३२ वर्षे रा. सध्या पप्पु खळदे यांची खोली, हॉटेल रांगडा दरबारचे मागे, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे मुळगाव-बैराहपुर, तहसिल फत्तेपुर, उत्तरप्रदेश ४)महंमद आरीफखान वय-४० वर्षे रा.अह रहेमान ट्रान्सपोर्ट, शालीमार हॉटेल समोर, जलील कंपाऊड धारावी, मुंबई मुळगाव-कुरही, तहसिल-बबेरु, जि.बांधा, उत्तरप्रदेश यांना ताब्यात घेवुन, **त्यांचेकडून ३,७८,६००/-रु. किंमतीचे ६३१० किलो वजनाचे चोरी केलेले लोखंडी सळईचे बंडल व चोरीचा माल घेवुन जात असलेला १५,००,०००/-रु किंमतीच्या टाटा ११०९ ट्रकनं. एमएच ४३ वाय ७८२८ असा एकुण १८,७८,६००/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन, त्यांचे विरुध्द तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर १९९/२०२३ भादवि कलम ३७९,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.** सदर गुन्हयाचा पुढील तपास खंडणी विरोधी पथकाचे पोलीस हवालदार प्रदीप गोडांबे हे करत आहे.

**सदरची कारवाई मा. विनय कुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.मनोज लोहीया, सह पोलीस आयुक्त, मा.डॉ.संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा.स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा.डॉ.प्रशांत अमृतकर, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार, सहा.पोलीस निरीक्षक उध्दव खाडे, सहा.पो.उप-निरी.अशोक दुधवणे, पोलीस अंमलदार किरण काटकर, प्रदीप गोडांबे, आशिष बोटके, प्रदीप गायकवाड यांचे पथकाने केली आहे.**

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे, पिंपरी चिंचवड